| MHAU030166492025 | फौ.कि.अर्ज क्र.६३२/२०२६<br><br>दिलीप वि. सरकार |
|---|---|

# निशाणी क्रमांक १ वरील आदेश

सदरचा अर्ज हा अर्जदार दिलीप सिताराम दानेकर यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे जप्त मुद्देमाल बंधपत्रावर परत मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, अर्जदार हे शेंद्रा येथे खाजगी नोकरी करत असून कुटूंबाचे पालन पोषण करतात. अर्जदार हा वेगवेगळया जागी पैशांची गूंतवणूक नेहमीच करीत असतात. त्याचप्रमाणे अर्जदार यांचे मोबाईलवर टेलिग्राम खाते चालू करण्यासाठी एक संदेश आला व त्यावर पैसे गूंतवणूक केल्यावर पैसे वाढून मिळतील अश्याप्रकारे फोन देखील अर्जदार यांना आला. त्यानंतर अर्जदाराने त्याचे खाते चालू करुन पैशांची गूंतवणूक केली. दिनांक १५.०१.२०२६ रोजी त्यांचया मोबाईल नं ८१४९९३३३३१ वर टेलिग्राम आले व सदरील टेलिग्राम वर एक लिंक दिलेली असून त्या लिंक वर जाताच टास्क दिला जाईल व जसे जसे टास्क सोडवत तसे तसे रक्कम वाढून मिळेल त्यावेळी अर्जदार यांनी सदरील लिंक वर बटन दाबताच त्यांना काही रक्कम त्यामध्ये गूंतवण्यास सांगितले व त्याचा मोबदला भरलेल्या रक्कमेपेक्षा जास्त मिळेल म्हंटल्यावर अर्जदार यांनी दि. १५/०१/२०२६ व १६/०१/२०२६ रोजी एकुण रक्कम रु १,५९,५००/– गूंतविली व त्यांना त्याचा मोबदला मिळाला नाही. अर्जदाराची सदरील रक्कम त्यांचे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा सेक्टर क्र. ९, सिडको टाउनशीप, औरंगाबाद खाते क्र. ३१७६०२६६५२ या खाते मधून गेलेली आहे.

३. ऑनलाइन गुंतवणूक फसवणुकीचा बळी असल्याचे लक्षात येताच, अर्जदाराने तात्काळ १६/०१/२०२६ रोजी छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील सायबर पोलिस ठाण्यात औपचारिक तक्रार दाखल केली. अर्जदार यांनी सायबर गुन्हा शाखेला गुन्हा नोंदविल्यानंतर अर्जदार

यांची एकूण रक्कम रुपये १,५९,५००/- (एक लाख एकोणसाठ हजार पाचशे रुपये) पैकी ६९,०३०/- (एकोणसत्तर हजार तीस रुपये) एवढी रक्कम गोठविण्यात आली.

४. अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदाराने सदरची रक्कम ही बँकेत पडून आहे तसेच, अर्जदाराच्या उदनिर्वाह करीता सदरील रक्कमेची अत्यंत आवश्यकता आहे. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पृष्ठयार्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडलेले आहे. अर्जदाराने ऑनलाईन तक्रारीची प्रत, अर्जदार यांचे आधार कार्ड व बँक स्टेटमेंट इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदर कागदपत्रे असे दर्शवितात की, सदर रक्कम अर्जदाराच्या खात्यातुन कपात झालेली आहे.

५. तपासी अंमलदार यांचे म्हणणे असे की, दिलीप सिताराम दानेकर यांनी क्रि. एम.ए.नं. ६३२/२०२६ अन्वये दाखल केले आहे. प्रस्तुत प्रकरणात संबंधाने अर्जदार यांनी NCCRP नॅशनल सायबर क्राईम रिपोटींग पोर्टल वर तक्रार दाखल केलेली असुन त्याचा ACK. NO. ३१९०१२६००१२७०८ असा आहे. सदर तक्रार पुढील चौकशी कामी पोलीस ठाणे सायबर येथे प्राप्त झाली होती. तक्रारदार यांची त्यांच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया खाते क्र. ३१७६०२६६५२ च्या खात्यातुन Rs.१,५९,५००/- रुपये ची आर्थिक फसवणुक झाल्याचे सदर तक्रार दिली होती. तसेच NCCRP पोर्टल द्वारे अर्जदार यांची फसवणुक झालेली रक्कमे Rs.६९,०३०/- रुपये इतकी रक्कम खालील विविध बँक खात्यावर गोठवण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

| Sr.No. | Bank Name | Account No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | State Bank of India | 36313866286 | 4,004/- |
| 2. | Axis Bank | 301010100044660 | 20,000/- |
| 3. | Indian Bank | 8222390147 | 146/- |
| 4. | Union Bank of India | 353601010038074 | 44,880/- |

६. सदर पोर्टलवर तक्रारदार यांची एकूण रक्कम ६९,०३०/- रु. ही वरील बँकेच्या खातेवर होल्ड करण्यात आलेली आहे. तरी संबंधित तक्रारदार दिलीप सिताराम दानेकर यांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक झालेली रक्कम ही तक्रारदार यांचे अकाउंट नंबर वर वटतील अशा अटी व शर्तीसह आमची काही एक हरकत नाही. अर्जदाराच्या खात्यावर परत करण्यास न्यायालयास योग्य तसेच विद्वान सरकारी वकीलांनी रक्कम योग्य त्या अटी व शर्तीवर परत करण्याची विनंती केली

आहे. प्रस्तुतची फिर्याद अर्जदारानेच दिलेली आहे. सदर मुद्देमालाचे स्वरुप पाहता ती रोख रक्कम असुन ती संबंधित बँकेने होल्ड आहे. अर्जदार यांच्या खात्यातुन सदर रक्कम हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे अर्जदारावर योग्य त्या अटी व शर्ती लादून जर सदरची रक्कम सुपूर्तनामा बंधपत्रावर परत दिली तर ते न्यायाच्या हितार्थ होईल आणि म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

(१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) जवाहरनगर पोलिस ठाणे, सायबर क्राइम, औरंगाबाद यांच्याकडे दाखल NCCRP पोर्टलद्वारे ACK. NO. ३११९०१२६००१२७०८ मधील रक्कम रुपये ६९,०३०/- ही रक्कम

| Sr.No. | Bank Name | Account No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | State Bank of India | 36313866286 | 4,004/- |
| 2. | Axis Bank | 301010100044660 | 20,000/- |
| 3. | Indian Bank | 8222390147 | 146/- |
| 4. | Union Bank of India | 353601010038074 | 44,880/- |

वरील खातेवर होल्ड करण्यात आलेली आहे. सदर रक्कम रुपये ६९,०३०/- रुपये अर्जदारास सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा सेक्टर क्र. ९, सिडको, टाउनशिप, औरंगाबाद खाते क्र. ३१७६०२६६५२ यावर रक्कम रुपये ६९,०३०/- सुपूर्तनामा बंधपत्र दिल्यानंतर त्यास परत करण्यात यावी.

(३) ज्यावेळेस मुद्देमाल हजर ठेवण्याचे आदेश करण्यात येतील त्यावेळेस अर्जदाराने विनाविलंब तो न्यायालयात हजर करावा.

(५) सदर आदेशाची प्रत, सुपूर्तनामा व छायाचित्रे या गुन्हयाच्या कागदपत्रांमध्ये अथवा दोषारोपपत्र दाखल झाले असल्यास त्यामध्ये जतन करुन ठेवण्यात यावीत.

PRACHI RADHAKISAN PALWE

Digitally signed by PRACHI RADHAKISAN PALWE
Date: 2026.03.30 17:07:57 +0530

दिनांक : ३०/०३/२०२६ (पी. आर.पालवे)

ठीकाण- औरंगाबाद प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. १२), औरंगाबाद.